13 SEP 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत संशोधनाची आता गरज

## कुलगुरू प्रा. डॉ. अरुण पाटील; शिवाजी विद्यापीठात 'स्तुती' अंतर्गत प्रशिक्षणाचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता १२ : भविष्यातही कालसुसंगत ठरेल, अशा शाश्वत स्वरूपाच्या संशोधनाची आता आवश्यकता आहे. ऊर्जेचे नवे नवे स्रोत शोधले जाऊ लागले आहेत. संशोधनाबरोबरच आता त्याच्या व्यापारीकरणाची गरज आहे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. अरुण पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षणाच्या उद्‌घाटनप्रसंगी आज ते बोलत होते. सौफ सेंटरचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या नेतृत्वाखाली देशभर असे स्तुती उपक्रम घेण्यात येत असून, त्याअंतर्गत विद्यापीठात याचे आयोजन केले होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्तुती कार्यशाळा सोमवारी झाली. कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी (डावीकडून) डॉ.अरुण पाटील, डॉ. पी. एस. पाटील, सुचिता लोखंडे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. संतोष तावरे.**

केंद्रीय उच्च व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या स्तुती (सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेंतर्गत सातदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठात केले आहे. १२ ते १८ सप्टेंबर या कालावधीत कार्यशाळा होणार आहे. आज याचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यशाळेला विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या शास्त्रज्ञ सुचिता लोखंडे यांची उपस्थिती होती. त्यांनी मंत्रालयाच्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

विद्यापीठाने स्तुती उपक्रमासाठी जे काम केले, त्याचे कौतुक केले. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी सौफ सेंटरमधील उपकरणांची तेथील कामाची माहिती दिली. स्तुती उपक्रमामध्ये देशभर काय चालू आहे, याबाबतही सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी त्यांच्या अध्यक्ष भाषणामध्ये विद्यापीठातील संशोधनाची, जैवविविधतेची माहिती सांगितली. 'कोणतेही उपकरण कितीही महाग असले, तरी विकत घेणे सोपे आहे; परंतु ते सांभाळणे आणि चालू स्थितीत ठेवणे हे जास्त अवघड आहे. असे त्यांनी यावेळी नमूद केले.

डॉ. अरुण पाटील म्हणाले, ''ऊर्जा क्षेत्रात दररोज नवे संशोधन समोर येत आहे. ऊर्जा ही माणसाची मूलभूत गरज असून त्याचे नवे स्रोत शोधणे सुरू आहे. आता कालातीत असणाऱ्या शाश्वत संशोधनाची आवश्यकता आहे. संशोधनाबरोबरच आता त्याच्या व्यापारीकरणाची गरज असून, हे संशोधन अधिकाधिक लोकांच्या उपयोगी पडेल.''

अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.

# आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत संशोधनाची गरज

## संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरूण पाटील यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संशोधन म्हणजे केवळ संशोधन पेपर प्रकाशित करणे नव्हे तर केलेल्या संशोधनाचे व्यापारीकरण होऊन जगाला विविध पर्याय उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश असला पाहिजे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर आता शाश्वत संशोधनाची गरज आहे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांनी केले आहे.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय आणि शिवाजी विद्यापीठातील स्तुति प्रशिक्षण उपक्रम सात दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण भारतातील आयआयटी केंद्रीय विद्यापीठासह अन्य विद्यापीठात यापूर्वी पाच कार्यक्रम घेण्यात आले.

डीएसटीच्या शास्त्रज्ञ सुचिता लोखंडे यांनी शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्राला भेट देऊन डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे कौतुक केले. सैफ सेंटरने जवळपास दोन दशके जुने असल्यासारखी प्रगती केली आहे, असे सांगितले. भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातील उपलब्ध विविध योजनांची त्यांनी सविस्तरपणे माहिती दिली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील, सोबत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डी. एस. टी. च्या सुचिता लोखंडे, स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे, सुविधा व्यवस्थापन समितीचे सभासद डॉ. संतोष तावरे.

कुलगुरू डॉ. अरुण पाटील म्हणाले, आज शाश्वत संशोधनाची गरज आहे. जग ऊर्जेकरीता वेगवेगळे पर्याय शोधत आहे. त्यासाठी संशोधनाच्या माध्यमातून विविध मार्ग उपलब्ध करून दिले पाहिजेत. डॉ. सोनकवडे अहोरात्र कष्ट करून भारतभर शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक उंचावत आहेत.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ परिसर सर्व सुविधांनी आणि जैवविविधतेने नटलेला आहे. कोणतेही उपकरण कितीही महाग असले तरी विकत घेणे सोपे आहे. परंतु ते सांभाळणे आणि चालू स्थितीत कायम ठेवणे हे अतिशय अवघड आहे, असे सांगितले. स्तुतिचे समन्वयक डॉ. सोनकवडे यांनी विद्यापीठातील उपलब्ध अत्याधुनिक उपकरणांविषयी माहिती दिली. डॉ. पी. डी. डोंगळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.



■ शिवाजी विद्यापीठात स्तुती उपक्रमाचे उद्घाटन

1 3 SEP 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत संशोधनाची गरज

## कुलगुरू प्रा. पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत संशोधनाची गरज आहे, असे मत संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील यांनी व्यक्त केले.

भारत सरकार विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, स्तुती (सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेअंतर्गत सात दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

कुलगुरू पाटील म्हणाले, शोधन म्हणजे केवळ संशोधन प्रकाशित करणे नव्हे तर केलेल्या संशोधनाचे व्यापारीकरण होऊन जगाला विविध पर्याय उपलब्ध करून देणे हा उद्देश असला पाहिजे..

'डीएसटी'च्या शास्त्रज्ञ सुचिता लोखंडे यांनी 'डीएसटी' या विविध योजनांची माहिती दिली. 'स्तुती'चे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी सैफ-डीएसटी-सीएसी केंद्रातील अत्याधुनिक उपकरणांविषयी माहिती दिली.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ परिसर वेगवेगळ्या सुविधा आणि जैवविविधता नटलेला आहे. कोणतेही उपकरण कितीही महाग असले तरी विकत घेणे सोपे आहे, परंतु ते सांभाळणे आणि चालू स्थितीत ठेवणे हे जास्त अवघड आहे. यावेळी डॉ. संतोष तावरे उपस्थित होते. डॉ. पी. डी. डोंगळे यांनी स्वागत केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. के. डी. पवार यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'स्तुती' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सुचिता लोखंडे, प्रा. आर. जी. सोनकवडे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

13 SEP 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत संशोधनाची गरज

## कुलगुरू अरुण पाटील

कोल्हापूर : प्रतिनिधी

विविध प्रकारची संशोधने सध्या सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर आता शाश्वत संशोधनाची गरज आहे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील यांनी शिवाजी विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे प्रायोजित, स्तुती योजनेंतर्गत १२ ते १८ सप्टेंबरदरम्यान कार्यशाळेचे आयोजन केले आहे.



स्तुती उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू अरुण पाटील, शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत अन्य मान्यवर.

प्रा. अरुण पाटील म्हणाले, जगभरात वेगवेगळ्या प्रकारचे संशोधन सुरू आहे. संशोधन म्हणजे केवळ संशोधन प्रकाशित करणे नव्हे. केलेल्या संशोधनाचे व्यापारीकरण होऊन जगाला विविध पर्याय उपलब्ध करून देणे हा संशोधकाचा उद्देश असायला हवा.

त्यापूर्वी स्तुतीचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यापीठातील सैफ, डीएसटी, सीएफसी केंद्रातील अत्याधुनिक उपकरणांची माहिती दिली. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ परिसर येथे वेगवेगळ्या सुविधा आणि जैवविविधता या विषयावर भर दिला. उपकरण महाग असले तरी विकत घेणे सोपे आहे; परंतु ते सांभाळणे आणि चालू स्थितीत ठेवणे हे जास्त अवघड आहे. स्वागत डॉ. पी. डी. डोंगळे यांनी केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.

महासत्ता

# दूरशिक्षण केंद्राच्यावतीने आज कार्यशाळा

कोल्हापूर,ता.११(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षणं आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने कोल्हापूर,सांगली,सातारा जिल्ह्यातील एकूण ८६ अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आज ता. १२ सप्टेंबर रोजी केंद्रामध्ये कार्यशाळेचे आयोजन केले असल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी दिली.

तरी अभ्यासकेंद्राच्या समन्वयक व लेखनिक यांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन संचालक प्रा.डॉ.के.मोरे यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील ३८७ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ३८७ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत.

विद्यापीठ उन्हाळी सत्रांतर्गत ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या आहेत. सोमवारी बी.व्होक., बी.कॉम., बी.कॉम. (बँक मॅनेजमेंट), फाईव्ह इयर लॉ, एम.एस्सी., एमबीए (एक्झिक्युटिव्ह) अशा ३१ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.